**प्रेसनोट** **दिनांक२३/०३/२०१९**

## कोंढवा पोलीस ठाणे,पुणे शहर

## गि-हाईकाचे बहाण्याने येऊन चोरी करणा-यांना अटक

दिनांक ३०/१२/२०१८ रोजी दुपारी १५.०० वा च्या सुमारास कड नगर उंड्री येथील टॉय वल्ड या खेळण्याचे दुकानात तीन अज्ञात व्यक्तींनी येऊन सायकल खरेदी करण्याचा बहाणा करुन दोन व्यक्तींनी फिर्यादीस बोलण्यामध्ये गुंतवून ठेवून एका व्यक्तीने फिर्यादीचे दुकानाचे ड्राव्हर मधून २,१८,०००/- इतकी रोख रक्कम चोरुन नेली बाबत कोंढवा पोलीस ठाण्यास गुन्हा रजि नं ८४६/२०१८ भा.द.वि कलम ३८०,३४ प्रमाणे दाखल करण्यात आला होता.

नमुद गुन्हयाचा तपास करीत असताना दिनांक २१/०३/२०१९ रोजी कोंढवा पोलीस ठाणे कडील तपास पथकातील पो.शि.८३२८ चव्हाण यांना त्यांचे गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, सदर चोरी करणारे इसमांपैकी ०२ इसम मरळ वजन काटा सोमजी चौक कोंढवा बुद्रूक पुणे येथे थांबलेले आहेत. तेव्हा वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो कोंढवा पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शन व सुचना प्रमाणे तपास पथकातील स्टाफ सदर ठिकाणी जाऊन इसम नामे (१) दिपक लक्ष्मण राठोड वय २३ वर्षे रा. गल्ली नं १२ सुंदर नगर मांगडेवाडी कात्रज पुणे (२) मनोहर उर्फ मोहन लक्ष्मण राठोड वय २२ वर्षे रा. गणपती मंदीरामागे कोंढवा खुर्द पुणे यांना ताब्यात घेऊन त्यांचेकडे नमुद गुन्हया बाबत चौकशी करता सदर इसमांनी त्यांचा एक साथीदार पशा पुर्ण नाव माहीत नाही याचे साथीने सदरचा गुन्हा केल्याचे कबूल केले आहे. नमुद आरोपींना दाखल गुन्हयात अटक करण्यात आली असून त्यांना मा न्यायालयाने दिनांक २५/०३/२०१९ पर्यत पोलीस कस्टडी रिमांड दिलेली आहे. नमुद आरोपीने अशाच प्रकारचा गुन्हा सिहंगड रोड पो स्टे हद्दीत केल्याचे कबूल केले आहे.

अशा प्रकारे कोंढवा पोलीस ठाण्याकडील ०३ महीने पुर्वी घडलेल्या ०१ गुन्हा व सिहंगड पोलीस ठाण्याकडील ०१ गुन्हा उघडकीस आणला आहे.गुन्हयाची उकल करण्यास कोंढवा पोलीसांना यश आलेआहे.

सदरची कामगिरी मा.श्री.सुनिल फुलारी सो,अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग पुणे शहर, मा.श्री.प्रकाश गायकवाड सो. पोलीस उप आयुक्त परिमंडळ ५,पुणे शहर,मा.श्री. सुनिल देशमुख सो.प्रभारी सहा पोलीस आयुक्त,वानवडी विभाग पुणे शहर, श्री.अनिल पाटील,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री. महादेव कुंभार पोलीस निरीक्षक,गुन्हे यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली पो उप नि श्री संतोष शिंदे पो.हवा.राजस शेख, इकबाल शेख ,पोना योगेश कुंभार, पृथ्वीराज पांडुळे, संजिव कळंबे, पोशि अजिम शेख, जगदीश पाटील, उमेश शेलार , सुरेश कोळगे, उमाकांत स्वामी, धिवार, मोरे, जया चव्हाण, आदर्श चव्हाण, यांचे पथकाने केलेली आहे.

(अनिल पाटील)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
कोंढवा पोलीस ठाणे,पुणे शहर